*त्रिपक्षीय करारातून राज्यात फुलतेय वन*

*आज चार करार*

*९५ हेक्टर क्षेत्रावर होणार वृक्षलागवड*
==========================================

मुंबई दि. ५ : आज वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत वन विभाग व स्वंयसेवी संस्था यांच्यात ४ त्रिपक्षीय करार संपन्न झाले याद्वारे राज्यात ९५ हेक्टर राखीव तसेच अवनत वनक्षेत्रावर साधारणत: ६० हजारांहून अधिक वृक्षलागवड करण्याचे निश्चित झाले. यामध्ये स्वंयसेवी संस्थांकडून अंदाजे ३ कोटी ८४ लाख रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

यावेळी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासमवेत वन विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, त्रिपक्षीय करारात सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या स्वंयसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

आज झालेल्या करारामध्ये मौजे निघोटवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील १० हेक्टर राखीव वनक्षेत्रावर मोरडे फूडस प्रा.लि. मंचर, पुणे या औद्योगिक तसेच मे. शाश्वत चॅरिटेबल ट्रस्ट मंचर या अशासकीय संस्थेने करार केला. विशेष बाब म्हणून त्यांच्या १० हेक्टर क्षेत्रावरील वृक्षलागवडीस अटी आणि शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली. ही संस्था प्रति हेक्टर ८२५ रोपे याप्रमाणे ८२५० रोपे लावणार आहे. यासाठी अपेक्षित खर्च साधारणत: ४६ लाख रुपयांचा आहे. दुसरा त्रिपक्षीय करार मौजे काळज, ता. फलटण, जिल्हा सातारा येथील २५ हेक्टर अवनत वनक्षेत्रावरील वृक्षलागवडीसाठी करण्यात आला. मे. कमिन्स इंडिया फाऊंडेशन, बालेवाडी, पुणे ही औद्योगिक संस्था तर संकल्प सामाजिक व शैक्षणिक ही अशासकीय संस्था यात सहभागी झाली आहे. वन विभागासोबत आज झालेल्या करारात मौजे काळज येथे २५ हेक्टरवर प्रति हेक्टर ६२५ याप्रमाणे १५ हजार ६२५ रोपे लावण्यात येतील. याचा अंदाजे खर्च १ कोटी १२ लाख ५६ हजार ८८४ रुपये इतका आहे. मे. कमिन्स ही संस्था पुण्यात ही २० हेक्टर क्षेत्रावर वारजे येथे ६२५ रोपे प्रति हेक्टर याप्रमाणे वृक्षलागवड करील. पहिल्या टप्प्यात २ हेक्टरवर १२५० रोपे लावण्यात येणार आहेत. यासाठी साधारणत: आठ लाख रुपये खर्च येईल.

चौथा करार हा मर्सिडीज बेंझ इंडिया प्रा. लि. चाकण यांच्यासमवेत करण्यात आला असून ते एकूण ४० हेक्टर राखीव वनक्षेत्रावर त्रिपक्षीय करारातून वृक्षलागवड करतील. येथे प्रति हेक्टर ८२५ रोपे अशी एकूण ३३ हजार रोपे लावली जातील ज्याचा खर्च २ कोटी १७ लाख रुपयांच्या आसपास राहील.